# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः19.12.2024 वारःगुरुवार

---

**ठळक बातम्या,**

१. एक देश एक निवडणूक संदर्भातल्या दोन विधेयकांवर विचारविनिमय करण्यासाठी 31 सदस्यांच्या संयुक्त संसदीय समितीची नेमणूक

२. केंद्रिय मंत्री अमित शहा यांच्या विधानाचा विपर्यास केला जात असल्याचा संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांचा आरोप

३. भारत आणि चीन यांच्यातली विशेष प्रतिनिधींची बैठक यशस्वी. संयुक्त राष्ट्र सरचिटणीस अँटोनिओ गुटेरस यांच्याकडूनही दोन्ही देशांच्या प्रयत्नांचं स्वागत

४.समुद्रत प्रवासी नौका दुर्घटनेत 13 जणांचा मृत्यू, पंतप्रधान मुख्यमंत्र्यांकडून मदत जाहीर

आणि

५. शस्त्रास्त्र तस्करी प्रकरणी एनआयए चे तर भ्रष्टाचार प्रकरणी सीबीआयचे छापे

**जेपीसी**

एक देश एक निवडणूक संदर्भातल्या दोन विधेयकांवर विचारविनिमय करण्यासाठी 31 सदस्यांच्या संयुक्त संसदीय समिती नेमण्यात आली आहे. या समितीत लोकसभेचे 21 आणि राज्यसभेचे 10 खासदार असतील. भाजप नेते पी. पी. चौधरी, अनुराग सिंग ठाकूर, पुरुषोत्तम रुपाला यांच्यासह काँग्रेस नेते प्रियांका गांधी, मनिष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांचा यासमितीमध्ये समावेश आहे.

**संसद**

केंद्रिय मंत्री अमित शहा यांच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यासंदर्भातल्या कथित विधानावरुन विरोधकांनी गोंधळ घातल्यामुळे काल संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं. लोकसभेत दुपारी 2 वाजता कामकाज पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न पीठासीन सभापतींनी केला. मात्र शहा यांच्या माफीची मागणी करत विरोधकांनी घोषणाबाजी केली. त्याला सत्ताधारी सदस्यांनी प्रत्युत्तर देताना गोंधळ वाढल्यामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेतही हेच चित्र दिसून आलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी कामकाज चालू देण्याची विनंती विरोधकांना केली. शहा यांच्या वक्तव्याचा विपर्यास केला जात आहे. काँग्रेसने भूतकाळात आंबेडकरांचा कसा अपमान केला हे शहा सभागृहात सांगत होते असं रिजिजू म्हणाले. त्यांच्या राज्यसभेतल्या भाषणातला ठराविक भाग लोकांमध्ये पसरवून गोंधळ माजवला जात आहे, काँग्रेसनं बाबासाहेबांच्या हयातीतच त्यांचा अनादर केला, लोकसभा निवडणुकीत त्यांना हरवण्यासाठी कटकारस्थानं केली असा आरोप रिजिजू यांनी केला.

**वैष्णव**

पुणे आणि नाशिक दरम्यान रेल्वे संपर्क वाढवण्याच्या दृष्टीनं 248 किलोमीटर लांबीच्या दौंड-मनमाड मार्गाच्या दुहेरीकरणाच्या कामाला मंजुरी देण्यात आली आहे. यातील 178 किलोमीटरचं काम यापूर्वीच सुरू करण्यात आलं असल्याची माहिती केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. याशिवाय नाशिक-साईनगर शिर्डी, पुणे-अहमदनगर दरम्यान नवीन दुहेरी मार्ग आणि साईनगर शिर्डी-पुणतांबा दरम्यान नवीन दुहेरी मार्गासाठी सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आल्याचं ते म्हणाले.

**भारत चीन**
भारत आणि चीन यांच्यातली विशेष प्रतिनिधींची 23 वी बैठक काल झाली. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि चीनचे परराष्ट्र मंत्री वँग यी बैठकीत सहभागी झाले होते. दोन्ही देशांमधल्या सीमा भागातल्या प्रश्नांवर योग्य, व्यवहार्य आणि दोन्ही बाजूंना मान्य होईल असा पर्याय शोधून शांततेसाठी प्रयत्न करण्यावर बैठकीत चर्चा करण्यात आली. द्विपक्षीय संबंध सुधारण्यासाठी राजकीय दृष्टीकोनातून चर्चा होणं महत्त्वाचं आहे या मुद्द्याचा दोन्ही नेत्यांनी पुनरुच्चार केला. त्यांनी परस्पर हिताच्या क्षेत्रिय आणि जागतिक मुद्द्यांवरदेखील चर्चा केली. डोभाल यांनी चीनचे उप राष्ट्राध्यक्ष हॅन झेंग यांच्यासोबतही संवाद साधला.

**गुटेरस भारत चीन**
द्विपक्षीय संबंध सुधारुन सीमा विवाद सकारात्मक रितीनं सोडवण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात नुकत्याच झालेल्या कराराचं संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरस यांनी स्वागत केलं आहे. त्यांचे प्रवक्ते स्टीफन ड्युरीक यांनी काल ही माहिती दिली.

**रसाळ साहित्य अकादमी पुरस्कार**
ज्येष्ठ समीक्षक डॉक्टर सुधीर रसाळ यांनी लिहिलेल्या ‘विंदांचे गद्यरुप’ या समीक्षाग्रंथाला साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारामुळं मराठी समीक्षा क्षेत्रातील एका व्रतस्थ साहित्यिकाचा सन्मान होत आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त करत रसाळ यांचं अभिनंदन केलं आहे.
कोकणी साहित्यिक मुकेश थळी यांना 'रंगतरंग' या निबंध संग्रहासाठी साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. मराठी, हिन्दी, इंग्रजीसहित 21 भाषांमधीलल पुरस्कारप्राप्त लेखकांना नवी दिल्लीत पुढील वर्षी ८ मार्च रोजी हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

**स्पीड बोट अपघात**
मुंबईजवळ काल संध्याकाळी एलिफंटाला जाणारी नीलकमल या प्रवासी नौकेच्या दुर्घटनेत 13 जणांचा मृत्यू झाला, यामध्ये नौदलाच्या 3 जवानांचा समावेश आहे. नौदल, तटरक्षक, बंदर आणि पोलिस पथकांनी तातडीनं केल्यामुळं 101 प्रवाशांना सुरक्षित वाचवण्यात आलं. 2 प्रवासी गंभीर जखमी असून त्यांना नौदलाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या घटनेप्रकरणी नौदलाच्या स्पीड बोट चालकासह इतरांविरुद्ध कुलाबा पोलीस ठाण्यात प्राथमिक माहिती अहवाल दाखल करण्यात आला आहे.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त करत मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून 5 लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. पंतप्रधान मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये मदत जाहीर करण्यात आली आहे.

**एनआयए**
राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयए नं काल आंतरराज्य शस्त्रास्त्र तस्करी प्रकरणी चार राज्यांत छापे घातले. बिहारमध्ये 12, नागालँडमध्ये 3 तर हरियाणा आणि जम्मू काश्मीर राज्यात प्रत्येकी एका ठिकाणी छापा घालून एनआयनं प्रतिबंधित शस्त्रास्त्रं, मोबाइल, मेमरी कार्डस आणि पेन ड्राइव्ज जप्त केले. यासह एक मोटार, सुमारे 14 लाख रुपये आणि काही कागदपत्रं ताब्यात घेण्यात आली आहेत.

**सीबीआय**
केंद्रिय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयनं सामुहिक भ्रष्टाचार प्रकरणी काल मुंबईतून सात सरकारी अधिकाऱ्यांना अटक केली आहे. त्यांच्या कार्यालयांमध्ये आणि निवासस्थानी घातलेल्या छाप्यात २७ स्थावर मालमत्तांच्या कागदपत्रांसह एक कोटींपेक्षा जास्त रोख रक्कम ताब्यात घेण्यात आल्याचं सीबीआयनं सांगितलं. सीप्झमधलं जागा आरक्षण, आयात मालाचं वितरण आणि अन्य गैरव्यवहारांसाठी मध्यस्थांमार्फत लाच घेतल्याचा आरोप या अधिकाऱ्यांवर ठेवण्यात आला आहे. सह विकास आयुक्त, उप विकास आयुक्त आणि दोन सहायक विकास आयुक्तांचा यामध्ये समावेश आहे.

**बहारिन मच्छिमार**

बहारिनमध्ये अटक करण्यात आलेल्या 28 भारतीय मच्छिमारांना मायदेशी परत आणण्यात आलं आहे. तमिळनाडूतल्या या मच्छिमारांना गेल्या सप्टेंबर महिन्यात बहारिनच्या सागरी हद्दीत अवैधरित्या प्रवेश केल्याबद्दल अटक करण्यात आली होती. या सर्वांच्या सुटकेसाठी तिथल्या भारतीय दूतावासानं यशस्वी प्रयत्न केले. या सर्वांना अटकेत असताना दूतावासानं सर्व प्रकारची मदत केली तसंच भारतात परतण्याचा प्रवास खर्चदेखील केला.

**क्रिकेट**

भारत आणि वेस्ट इंडिजच्या महिला क्रिकेट संघांदरम्यान 20 षटकांचा तिसरा सामना आज नवी मुंबईत खेळला जाणार आहे. तीन सामन्यांच्या या मालिकेत दोन्ही संघांनी एकेक सामना जिंकून बरोबरी केली आहे.

**आर अश्विन**

भारतीय पुरुष क्रिकेट संघातील अष्टपैलू खेळाडू रविचंद्रन अश्विन यानं काल आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याची घोषणा केली. उत्कृष्ट फिरकी गोलंदाज असलेल्या आर. अश्विनने 37 वेळा 5 किंवा 5 पेक्षा जास्त खेळाडू बाद करणारा पहिला भारतीय गोलंदाज होण्याचा मान पटकावला आहे. दरम्यान बॉर्डर -गावस्कर कसोटी मालिकेतील तिसरा सामना काल अनिर्णित  राहिला. काल पाचव्या दिवशी पावसामुळे खेळ थांबवावा लागल्यामुळे सामना अनिर्णित राहिला.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.